2. The above results were reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors in their respective meetings held on 23rd June 2021.

For McLeod Russel India Limited
Sd/-
Aditya Khaitan
Chairman & Managing Director
DIN : 00023788

Place: Kolkata
Date : 23 June 2021

A Member of the WM Williamson Magor Group

गेल इंडिया, वितारा एनर्जीची राज्यात १६ हजार ५०० कोटींची गुंतवणूक

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

मुंबई : नैसर्गिक वायू निर्मिती क्षेत्रातील गेल इंडिया तसेच ऑस्ट्रेलियातील वितारा एनर्जी कंपनीने राज्यात सुमारे १६ हजार ५०० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतच्या सामंजस्य करारावर गुरुवारी उद्योगमंत्री सुभाष देसाई यांच्या उपस्थितीत स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.

गेल इंडिया रायगड जिल्ह्यातील उसर येथे प्रकल्पाचा विस्तार करणार असून येथे ८ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. येथील प्रकल्पात एलपीजी निर्मिती व वितरण, एलएनजी वायू पुनर्भरण, पेट्रोकेमिकल आदींची निर्मिती केली जाणार आहे. २०२५ पर्यंत हा प्रकल्प कार्यान्वित होईल, अशी माहिती कंपनीचे संचालक मनोज मेश्राम यांनी दिली.


दुसरा सामंजस्य करार ऑस्ट्रेलियातील वितारा एनर्जी लिमिटेड कंपनीसोबत करण्यात आला. किमान कार्बन तंत्रज्ञानाचा वापर करून नैसर्गिक वायू निर्मितीसाठी ही कंपनी प्रसिद्ध आहे. यवतमाळ जिल्ह्यात कंपनी प्रकल्प सुरू करणार आहे. जैवइंधन निर्मितीसोबत अपारंपरिक डिझेल, विमानांचे इंधन, जैवइंधन, इथेनॉलनिर्मिती आदी क्षेत्रांत काम करणार आहे. या प्रकल्पासाठी ८५०० कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाणार असल्याचे कंपनीचे कार्यकारी संचालक क्लिव स्टिफन्स यांनी स्पष्ट केले. २०२२ पर्यंत हा प्रकल्प कार्यान्वित होणार आहे.

राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या मॅग्नेटिक महाराष्ट्र संकल्पनेला या सामंजस्य करारातून खऱ्या अर्थाने हातभार लागला आहे. देश-विदेशातील गुंतवणूकदारांनी यापूर्वी तीन टप्प्यांत राज्य शासनासोबत एक लाख १२ हजार कोटींचे करार केले आहेत. त्याचाच पुढील टप्पा म्हणून आज १६ हजार ५०० कोटींचे गुंतवणूक करार करण्यात आले. गेल इंडिया व वितारा कंपनीच्या गुंतवणुकीमुळे हरित ऊर्जा निर्मितीला चालना मिळेल, याशिवाय राज्याच्या औद्योगिक प्रगतीस हातभार लागेल, असा विश्वास उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी व्यक्त केला.

सर्वपक्षीय कृती समितीचा इशारा

...तर विमानतळाचे काम बंद पाडू!

लोकसत्ता, विशेष प्रतिनिधी



नवी मुंबई : येथे होऊ घातलेल्या आंतरराष्ट्रीय विमानतळाला प्रकल्पग्रस्तांचे दिवंगत नेते खासदार दि.बा. पाटील यांचे नाव द्यावे, या मागणीसाठी गुरुवारी मुंबई, ठाणे, पालघर, रायगड या जिल्ह्यातून हजारोच्या संख्येने प्रकल्पग्रस्त बेलापुरात धडकले होते.

प्रकल्पग्रस्तांनी सिडकोच्या मुख्यालयाला घेराव घालू नये यासाठी पोलिसांनी बुधवार पासून सिडकोकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यांची नाकाबंदी केली होती. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांना सिडको मुख्यालयापासून दोन किलोमीटर अंतरावर पामबीच मार्गावर जाहीर सभा घेण्याची परवानगी देण्यात आली होती. १५ ऑगस्टपर्यंत दि.बा. पाटील नामकरण न झाल्यास विमानतळाचे काम बंद पाडण्याचा इशारा या सभेत माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी दिला. त्यामुळे हे आंदोलन अधिक चिघळण्याची शक्यता आहे.

सिडकोने एप्रिल महिन्यातील संचालक मंडळाच्या बैठकीत नियोजित नवी मुंबई विमानतळाचे बाळासाहेब ठाकरे नामकरण करण्याचा ठराव मंजूर करून शासनाकडे पाठविला आहे. तेव्हापासून संतप्त प्रकल्पग्रस्तांनी दि. बा. पाटील यांच्या नावाचा आग्रह धरला आहे. त्याला भाजप आणि आरपीआय या दोन पक्षांनी पाठिंबा दिला आहे.

राज्य सरकारचे या मागणीकडे लक्ष वेधण्यासाठी १० जून रोजी प्रकल्पग्रस्तांनी मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रात मानवी साखळी आंदोलन केले होते. त्यानंतरही मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी प्रकल्पग्रस्तांच्या या मागणीला सकारात्मक प्रतिसाद न दिल्याने गुरुवारी घेराव आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र, सिडको परिसरात पोलिसांनी बुधवार पासून केलेल्या नाकाबंदीमुळे हे घेराव आंदोलन न होता प्रकल्पग्रस्तांच्या मोर्चाचे जाहीर सभेत रूपांतर झाले.

या सभेत माजी खासदार रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, महेश बालदी, रमेश पाटील, मंदा म्हात्रे, राजू पाटील, रवींद्र चव्हाण, माजी खासदार संजीव नाईक, जगन्नाथ पाटील, हुसेन दलवाई यांनी विमानतळाला दि.बा. पाटील यांचे नाव देण्याचा आग्रह धरला.

प्रकल्पग्रस्तांनी केलेली दोन्ही आंदोलने ही शांतता मार्गाने केली आहेत पण यानंतरची आंदोलने ही शांततापूर्ण असणार नाहीत असा इशारा देखील या नेत्यांनी दिला आहे. पोलिसांनी या सभेत सहभागी होणाऱ्या सर्व नेत्यांवर गुन्हे दाखल केले आहेत.

दुपारी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ.संजय मुखर्जी याची भेट घेऊन निवेदन दिले. विमानतळाला बाळासाहेब ठाकरे यांचे नाव न देता त्या ऐवजी दि.बा. पाटील यांचे नाव देण्यात यावे असे या वेळीही स्पष्ट करण्यात आले आहे.

करोना अंतर नियमांचा विसर

- सिडको भवनला घेराव घालू नये यासाठी पोलिसांनी बेलापुरात येणारे सर्व रस्ते बंद केले होते. सिडको समोरूनच शीव पनवेल महामार्ग जातो.
- शीव पनवेल मार्गावर दिवसभरात लाखो वाहने धावतात तर सिडको परिसरात १५ ते २० हजार वाहने ये जा करीत असतात.
- ही सर्व वाहतूक थांबवून पोलिसांनी प्रकल्पग्रस्तांना घेरावापासून दूर ठेवले पण यामुळे या मार्गावरून ये जा करणाऱ्या वाहनांना गुरुवारी मोठा वळसा घालून शिळफाटा मार्गे कळंबोलीला जावे लागले.
- करोनाची साथ अद्याप असताना हजारोंचा जनसागर एकत्र आला होता. यावेळी करोना आरोग्य नियमांची पायमल्ली झाल्याचे सर्वत्र दिसून येत होते.
- आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकांची भेट घेतली.

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या शुल्कात घट

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : राज्यातील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयांचे शुल्क साधारण २५ टक्क्यांनी कमी होणार असून शुल्क १६ हजार २५० रुपयांनी कमी करण्यात येणार आहे. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी याबाबत घोषणा केली.

राज्यातील शासकीय अभियांत्रिकी, अनुदानित स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयांची आढावा बैठक गुरुवारी झाली. या बैठकीत शुल्ककपातीचा निर्णय घेण्यात आला. नियमित शुल्करचनेनुसार विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्कासह इतर सुविधांचे शुल्कही भरावे लागते. करोनाच्या साथीमुळे गेल्या वर्षभरात विद्यार्थी महाविद्यालयांत प्रत्यक्ष उपस्थित नव्हते. त्यामुळे ग्रंथालय, जिमखाना, अशा सुविधांचे शुल्क कमी करण्यात येणार आहे. राज्यातील साधारण २० हजार विद्यार्थ्यांना या निर्णयाचा फायदा होणार आहे. 'करोनाकाळात विद्यार्थी, पालकांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. त्यांच्या अडचणी लक्षात घेऊन शुल्क कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे,' असे सामंत यांनी सांगितले.

या बैठकीत शासकीय आणि अनुदानित संस्थांना शिक्षक आणि शिक्षकेतर पदे कंत्राटी तत्त्वावर स्वतःच्या निधीतून भरण्यास मान्यता देण्यात आली.

व्हीजेटीआयच्या वसतिगृहाचे 'मातोश्री' असे नामकरण

माटुंगा येथील वीरमाता जिजाबाई टेक्नॉलॉजी इन्स्टिट्यूट (व्हीजेटीआय) येथील मुलींच्या वसतिगृहाचे बांधकाम पूर्ण झाले आहे. या वसतिगृहाचे नामकरण 'मातोश्री' असे करण्यात येणार आहे.

गुजरातमधील नार्गोल बंदराचा 'ग्रीनफिल्ड पोर्ट' म्हणून विकास

अहमदाबाद : दक्षिण गुजरातमधील नार्गोल बंदर 'ग्रीनफिल्ड पोर्ट' म्हणून विकसित करण्यास गुजरातचे मुख्यमंत्री विजय रुपानी यांनी मंजुरी दिली आहे. यऽा बंदराचा विकास सरकारी-खासगी भागीदारीतून बांधा, मालकीहक्क घ्या, चालवा आणि हस्तांतरित करा (बीओओटी- बूट) या तत्त्वावर ५० वर्षांच्या वाढीव मुदतीसाठी करण्याचा निर्णय गुजरात सरकारने घेतला आहे.

या ग्रीनफिल्ड बंदर प्रकल्पाचा बीओओटी कालावधी ३० वर्षांऐवजी ५० वर्षे ठेवून गुजरात सरकार एक उदाहरण समोर ठेवत आहे.



मुख्यमंत्री विजय रुपानी यांची मंजुरी

'बीओओटी' कालावधी वाढवण्याच्या गुजरात सरकारच्या निर्णयामुळे विकासकाला गुंतवणुकीवर अधिक परताव्याची हमी मिळेल. सध्याची परिस्थिती लक्षात घेता त्यातून विकासकाला प्रोत्साहन मिळू शकेल. या बंदराच्या विकासासाठी जागतिक निविदा काढून विकासकाची निवड करण्यात येणार आहे. ही प्रक्रिया पारदर्शक, मजबूत आणि लवचीक असेल, असेही गुजरात सरकारने स्पष्ट केले आहे. या प्रकल्पात पहिल्या टप्प्यात ३८०० कोटींची गुंतवणूक अपेक्षित आहे. प्रकल्पाचा पहिला टप्पा पूर्ण झाल्यानंतर त्याची व्याप्ती वाढवण्यासाठी विकासकाला पूर्णपणे मुभा देण्यात येणार आहे.

मुंबईतील जेएनपीटी बंदराची सध्याची कंटेनर हाताळणीची क्षमता एक कोटी आहे. २०२५ पर्यंत त्याची क्षमता कमी होईल. त्यामुळे गुजरात विकसित करीत असलेल्या ग्रीनफिल्ड बंदराला मोठी संधी आहे.

मुंबईपासून सुमारे १४० किमी उत्तरेला आणि सुरतपासून १२० किमी असलेल्या नार्गोल बंदरात विविध प्रकारच्या कंटेनरची हाताळणी करण्यात येईल. डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर (डीएफसी) आणि दिल्ली मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉरसून हे बंदर नजीक आहे.

घाटकोपरमधून बालकाचे तर कुर्ल्यातून मुलीचे अपहरण

मुंबई : शेजारच्या मुलाचे अपहरण करून त्याचा सांभाळ करण्याच्या प्रयत्नात असलेल्या एकाला पोलिसांनी अहमदनगर येथून अटक केली. मेहबूब शेख असे आरोपीचे नाव आहे. तो मजुरीचे काम करतो. तर आणखी एक घटनेत कुर्ला येथून १४ वर्षीय मुलीचे अपहरण केल्याचीही घटना घडली.

मेहबूब हा घाटकोपर परिसरात भटवाडी भागात राहतो. तेथेच वैष्णवी खान ३ वर्षांच्या बालकासह राहत होती. सना खान हिने या मुलाला वैष्णवीकडे सांभाळण्यासाठी सोपविले होते. मेहबूब नेहमी या मुलाशी खेळत असे. त्याच्या चांगल्या भविष्यासाठी मेहबूबने त्याचे अपहरण करून अहमदनगर येथे नेले, असे त्याने पोलिसांना सांगितले. सनाने घाटकोपर पोलिसांकडे तक्रार दिली होती.

दरम्यान, प्रेम प्रकरणातून पळून गेलेल्या विवाहित महिलेने अन्य दोन मित्रांच्या मदतीने कुर्ला परिसरातून तरुणीचे अपहरण केले होते. या प्रकरणी पोलिसांनी छब्बीर अन्सारी (२१) आणि शोहेब खान (२०) या दोघांना टिटवाळा परिसरातून अटक केली.

CONFIDENCE FUTURISTIC ENERGETECH LIMITED
CIN: L74110DL1985PLC021328
Regd. Off.: FLAT 515-A-6, BHIKAJI CAMA PLACE, NEW DELHI, DL 110066 IN
Corporate Off.: 404, SATYAM APARTMENT, WARDHA ROAD, DHANTOLI, NAGPUR-12 IN

PUBLIC ANNOUNCEMENT

Notice is hereby given that CONFIDENCE FUTURISTIC ENERGETECH LIMITED ("the Company") is in the process of applying to the Metropolitan Stock Exchange of India Limited (MSEI) for voluntary delisting of its Equity Shares in terms of Regulation 5 & 6 and other applicable provisions of SEBI (Delisting of Equity Shares), Regulations, 2021. Neither the Company nor the investors derive any particular benefit by continuing the listing of the Equity Shares on the MSEI.

The Company's Equity Shares however, will continue to be listed on the BSE Limited (BSE). With the nationwide and extensive network of terminals set-up by the BSE, investors have access to online dealings in the Company's shares and therefore, in accordance with the Delisting Guidelines, an exit opportunity is not required to be given to the shareholders. In view of this, the proposed delisting of the Company's Equity Shares on the MSEI will not be prejudicial to or affect the interest of the investors.

Post Delisting Capital Structure : There would be no change in the capital structure of the Company post delisting.

For CONFIDENCE FUTURISTIC ENERGETECH LIMITED
Sd/-
NITIN KHARA
MANAGING DIRECTOR
(DIN: 01670977)

Place: Nagpur
Date: 25.06.2021

बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका)

निविदा सूचना

खालील सामग्रीच्या पुरवठ्याकरिता 'ई' निविदा मागविण्यात येत आहेत.

(१) ७१०९६ – जी.आय. अर्थिंग वायर्स ५५ स्क्वे. एमएम (७/११ एसडब्ल्युजी), (२) अॅन्युअल रेट कॉन्ट्रॅक्ट फॉर परचेस ऑफ ६ वे लो व्होल्टेज डिस्ट्रीब्युशन पिलर्स, (३) अॅन्युअल रेट कॉन्ट्रॅक्ट फॉर परचेस ऑफ १० वे लो व्होल्टेज डिस्ट्रीब्युशन पिलर्स, (४) अॅन्युअल रेट कॉन्ट्रॅक्ट फॉर परचेस ऑफ १२ वे लो व्होल्टेज डिस्ट्रीब्युशन पिलर्स, (५) सप्लाय ऑफ १.१ केव्ही, अॅल्युमिनियम कंड. एक्सएलपीई केबल्स ऑफ व्हेरियस साइजेस, (६) सप्लाय ऑफ २-वे, नॉन एक्सटेनसिबल, आऊटडोअर, एसएफ६/सॉलिड इन्सुलेटेड, रिंग मेन युनिट, (७) ७१०५४ – ३ वे सोलोनॉइड स्विच, २४ व्ही, (८) ७१०६० – रेडिएटर असेंब्ली, (९) ७१०६२ – एस/ए ऑफ विथड्रावल प्लेट, (१०) ७१०९७ – मॉडिफाइड अॅक्सिलरेटर केबल, (११) ७१०६९ – फोर्क लिफ्ट ट्रक (डिझेल), (१२) ७१११४ – परचेस ऑफ टायर फ्लॅप्स २० एन अॅण्ड २० आरआर, (१३) ७१०७५ – ५ इअर्स एएमसी फॉर पॅनॉसोनिक ३३ नं. ऑफ प्रिंटर ऑफ डिइसीए अॅण्ड अदर डिपार्टमेंट, (१४) ७१११० – परचेस अॅण्ड इनग्रेव्हींग ऑफ १५ जीएमएस सिल्व्हर मेडल्स.

'ई'-निविदा पुन्हा मागविण्यात येत आहेत.

(१५) ७०७२६, (१६) ७०७९१, (१७) ७०८३४, (१८) ७०८४३, (१९) ७०८४४, (२०) ७०८५४, (२१) ७०९०४, (२२) ७०९८३, (२३) ७०९४०, (२४) ७०९४६, (२५) ७०७०६, (२६) ७०८२८, (२७) ७०७०८.

टीप : अधिक तपशिलाकरिता https://mahatenders.gov.in हे संकेतस्थळ पहावे.
ज.सं.अ./सप्रव्य(सा.)/३३/२०२१ महाव्यवस्थापक

NOTICE
(Tata Consultancy Services Limited)
Regd Office - 9th Floor, Nirmal Building, Nariman Point, Mumbai-400021

Notice is hereby given that the certificate for the undermentioned securites of the Company have been lost and the applicants have applied to the company to issue duplicate certificates. Any person who has a claim in respect of the said securities should lodge such claim with the company at its Registered office within 15 Days from this date, else the company will proceed to issue duplicate certificates without further intimation.

Name of Share Holders	Kindl of Securities and face value	No of Securities	Distinctive Numbers
Smt. Sharda Auluck (1st Holder) Smt. Archna Auluck (2nd Holder)	Equity Shares of Re.1.00 each	147	489483265 To 489483411
Smt. Sharda Auluck (1st Holder) Smt. Archna Auluck (2nd Holder)	Equity Shares of Re.1.00 each	294	978900123 To 978900416
Smt. Sharda Auluck (1st Holder) Smt. Archna Auluck (2nd Holder)	Equity Shares of Re.1.00 each	588	1970640011 To 1970640598
Smt. Sharda Auluck (1st Holder) Smt. Archna Auluck (2nd Holder)	Equity Shares of Re.1.00 each	147	480287879 To 480288025

Place: Mumbai
Date: 24.06.2021

1) Anil Auluck
2) Sunil Auluck
(Applicants)

नवीन फ्लोरिन इन्टरनॅशनल लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय : दुसरा मजला, सनटेक सेन्टर, ३७/४० सुभाष रोड, विलेपार्ले (पू.), मुंबई-४०० ०५७. टेलि. क्र. : ०२२-६६५०९९९९
फॅक्स क्र. : ०२२-६६५०९८००, वेबसाइट : www.nfil.in,
ई-मेल : info@nfil.in सीआयएन क्र. : एल२४११०एमएच१९९८पीएलसी११५४९९

सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, सध्या चालू असलेली कोव्हिड-१९ महामारी लक्षात घेता निगम कामकाज मंत्रालयाच्या दिनांकित १३ जानेवारी, २०२१, ०५ मे, २०२०, ०८ एप्रिल, २०२० व १३ एप्रिल, २०२० साधारण परिपत्रके आणि कंपन्या अधिनियम, २०१३ ('कायदा') आणि त्याखालील तयार केलेले नियम यासह वाचलेल्या लागू तरतुदी आणि दिनांकित १३ जानेवारी, २०२१ व १२ मे, २०२० सेबी परिपत्रकांच्या अनुपालनार्थ, एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार कामकाजावर विचारविनिमय करण्याकरिता कंपनीची २३वी वार्षिक सर्वसाधारण सभा ('एजीएम') व्हिडीओ कॉन्फरन्सिंग ('व्हीसी')/ अदर ऑडियो व्हिज्युअल मिन्स ('ओएव्हीएम') द्वारा सोमवार, २६ जुलै, २०२१ रोजी दु. ०३.०० वा. (भाप्रवे) घेण्यात येणार आहे. 'व्हिसी'/ 'ओएव्हीएम'द्वारा एजीएममध्ये उपस्थित राहणाऱ्या सदस्यांची गणपूर्ती कायद्याच्या कलम १०३ अंतर्गत विचारात घेतली जाणार आहे. पूर्वोक्त एमसीए व सेबी परिपत्रकांच्या अनुसार, वित्तीय वर्ष २०२०-२१ करिता कंपनीच्या वार्षिक अहवालासमवेत एकत्रित एजीएमच्या सूचनेची इलेक्ट्रॉनिक प्रत सर्व सदस्यांना, ज्यांचे ई-मेल आयडी'ज कंपनी/ आरटीए'कडे नोंदणीकृत आहेत, पाठविण्यात येणार आहे. सदर प्रत www.nfil.in या कंपनीच्या वेबसाइटवर, www.bseindia.com या बीएसई लिमिटेडच्या वेबसाइटवर आणि www.nseindia.com या नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या वेबसाइटवर तसेच https://evoting.kfintech.com/ या केफिन टेक्नोलॉजिस प्रायव्हेट लिमिटेडच्या ('केफिन टेक') वेबसाइटवरसुद्धा उपलब्ध असेल.

ज्या सदस्यांनी त्यांचे ई-मेल पत्ते नोंदणीकृत केलेले नाहीत अशा सदस्यांना परिणामी वार्षिक अहवाल, एजीएमची सूचना व ई-वोटिंग सूचना पाठविता येणार नाहीत, ते https://ris.kfintech.com/clientservices/mobilereg/mobileemailreg.aspx या वेबलिंकवर प्रवेश करून 'केफिन टेक'कडे त्यांचा ई-मेल पत्ता व मोबाइल नंबर तात्पुरता नोंदणीकृत करू शकतील. सदस्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी युजर आयडी व पासवर्डसमवेत सूचना व ई-वोटिंग सूचनांच्या सॉफ्ट प्रती पाठविण्याकरिता ई-मेल पत्ता व मोबाइल नंबर प्राप्त करण्याकरिता मार्गदर्शक सूत्रांनुसार प्रक्रियेचे अनुपालन करावे. जर कोणतीही शंका असल्यास, सदस्य einward.ris@kfintech.com यावरून लेखी विनंती करू शकतील.

जर ई-मेल आयडी'ज याआधी नोंदणीकृत केलेले नसल्यास कायमस्वरूपी नोंदणीकरिता खालील प्रक्रियेबाबत सदस्यांनी नोंद घ्यावी : (१) ज्या सदस्यांकडे प्रत्यक्ष स्वरूपात भाग आहेत ते पुढील तपशिलासमवेत einward.ris@kfintech.com यावरून विनंती पाठवू शकतील- फोलिओ नंबर, नाव, भाग प्रमाणपत्राची स्कॅन्ड प्रत (पुढील व मागील बाजू), पॅन कार्डची स्वयं-साक्षांकित स्कॅन्ड प्रत व पत्त्यासंबंधित कोणताही पुरावा; (२) ज्या सदस्यांकडे डिमॅट स्वरूपात भाग आहेत ते त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपन्ट्सकडे ('डीपी'ज') त्यांच्या ई-मेल आयडी'जची नोंदणी करू शकतील.

सदस्यांना एजीएम सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार कामकाज विचारविनिमयावर इलेक्ट्रॉनिक प्रणालीत त्यांचे मतदान करण्याची संधी, रिमोट ई-वोटिंग किंवा एजीएम कालावधीत ई-वोटिंगद्वारा, मिळणार आहे. सदस्यांना तसे अनुकरण करण्याकरिता सविस्तर प्रक्रियेची, ज्या सदस्यांकडे डिमॅट स्वरूपात, प्रत्यक्ष स्वरूपात भाग आहेत आणि ज्या सदस्यांचे ई-मेल आयडी'ज नोंदणीकृत केलेले नाहीत, अशा सदस्यांना एजीएम सूचनेमध्ये तरतूद करून दिलेली आहे.

३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाकरिता कंपनीच्या संचालक मंडळाद्वारा शिफारस केल्यानुसार प्रति भाग ₹ ६.०० अंतिम लाभांशाचे, जर आगामी एजीएममध्ये मान्य झाल्यास, ३० जुलै, २०२१ रोजी किंवा त्यानंतर पात्र सदस्यांना प्रदान करण्यात येईल. लाभांशाचे प्रदान ज्या सदस्यांनी त्यांचा बँक तपशील अपडेट केलेला आहे त्यांना इलेक्ट्रॉनिक प्रणालीत करण्यात येईल. जर सदस्यांचा बँक अकाऊन्ट तपशील उपलब्ध नसल्यास किंवा अपडेशन झालेले नसल्यास, कंपनी/ आरटीए'कडील त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यांवर सदर सदस्यांना कंपनी डिव्हिडण्ड वॉरन्ट्स/ डिमाण्ड ड्राफ्ट्स पाठवील.

बँक अकाऊन्टमध्ये लाभांश रकमेची थेट स्वीकृती होण्याकरिता : (१) ज्या सदस्यांकडे डिमॅट स्वरूपात भाग आहेत त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या संबंधित डीपी'जकडे त्यांचा बँक अकाऊन्ट तपशील अपडेट ठेवावा; (२) ज्या सदस्यांकडे प्रत्यक्ष स्वरूपात भाग आहेत त्यांना विनंती करण्यात येते की त्यांनी 'केफिन टेक्नोलॉजीस प्रायव्हेट लिमिटेड, सेलेनियम टॉवर 'बी', प्लॉट नं. ३१-३२, गाचिबोवली, फायनान्शियल डिस्ट्रिक्ट, नानाक्रमगुडा, हैदराबाद-५०० ०३२' येथे कव्हरिंग लेटर, पहिल्या सदस्याद्वारा यथोचितरीत्या स्वाक्षरीकृत, छापील नाव व बँक अकाऊन्ट तपशिलासमवेत कॅन्सल्ड चेक लीफसह आणि पॅन कार्डची यथोचितरीत्या स्वयं-साक्षांकित प्रत सादर करावी. जर कॅन्सल्ड चेक लीफवर सदस्याचे नाव छापील नसल्यास सदस्यास विनंती करण्यात येते की, त्याने बँक पासबुक स्टेटमेन्टची स्वयं-साक्षांकित प्रत जोडावी.

वित्त कायदा, २०२०च्या अनुसार, लाभांश उत्पन्न ०१ एप्रिल, २०२०च्या प्रभावापासून सदस्यांच्या हाती करयोग्य असेल आणि कंपनीला लागू असल्यानुसार विहित दरात सदस्यांना प्रदान केलेल्या लाभांशामधून टॅक्स अॅट सोर्स वजात करणे आवश्यक आहे. यासंबंधित सदस्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी कंपनीकडे संबंधित कागदपत्रे सादर करावीत. या बाबतीत सदस्यांशी तपशीलवार पत्रव्यवहार करण्यात येईल, ज्यांनी त्यांचे ईमेल आयडी'ज नोंदणीकृत केलेले आहेत. सदर तपशीलवार माहिती https://nfil.in/investor/comp_announce.html या कंपनीच्या वेबसाइटवर आणि स्टॉक एक्स्चेंजेसच्या वेबसाइटवरसुद्धा उपलब्ध आहे.

नवीन फ्लोरिन इंटरनॅशनल लिमिटेड करिता
स्वाक्षरी/-
नीरज बी. मंकड
अध्यक्ष विधि व कंपनी सचिव

स्थळ : मुंबई
दिनांकित : २४ जून, २०२१

PADMANABH MAFATLAL GROUP

दि साऊथ इंडियन बँक लिमिटेड
SOUTH INDIAN Bank
मुंबई प्रादेशिक कार्यालयः ८०४, परिणी क्रेसेन्झो, जी ब्लॉक, वांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रा (पूर्व), मुंबई - ४०००५१.
दुर. क्र. : ९१ २२ ६७८६८८८८ फॅक्स : ९१ २२ ६७८६८८४४

संदर्भः आरओ-एम यु एम / जी ई एन / ५१ /२०२०-२१

परिशिष्ट - चार - ए
(नियम ८(६) चे परंतुक पहा)
स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना

दि सेक्युरिटायझेशन अँड रीकंस्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सुक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ सहवाचता सेक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ चा नियम ८(६) च्या अन्वये सूचना.

याद्वारे जनतेस आणि विशषतः हमीदार यांना सूचना देण्यात येते की, कर्ज घेणारे श्री. योगेश सावंत आणि सौ.मयुरी योगेश सावंत दोघेही राहणार सदनिका क्र.६०४, डी-विंग, सोनम ज्ञान, ओल्ड गोल्डन नेस्ट फेज -१ ,मिरा भायंदर मार्ग, आयसीआयसीआय बँकेजवळ, ठाणे, महाराष्ट्र- ४०११०५ यांच्याकडून दि साऊथ इंडियन बँक लिमिटेड, मुंबई पवई शाखा यांना दिनांक २२.०६.२०२१ अनुसार देय असलेल्या रक्कम रुपये २,७२,८३,३३४.५७ (**रुपये दोन कोटी बहात्तर लाख त्र्याऐंशी हजार तीनशे चौतीस आणि पैसे सत्तावन्न फक्त**) वसुली करण्यांसाठी दि साऊथ इंडियन बँक लिमिटेड, मुंबई पवई शाखा यांच्या प्राधिकृत अधिकाऱ्याने दिनांक २४.०८.२०२० रोजी सांकेतीक कब्जा घेतलेल्या दि साऊथ इंडियन बँक लिमिटेड, मुंबई पवई शाखा यांच्याकडे गहाण ठेवण्यात / प्रभारित करण्यात आलेल्या खालील वर्णनाच्या स्थावर मालमत्तेची दिनांक **१२.०७.२०२१** रोजी "जेथे आहे", "जसे आहे", आणि "जे काही आहे" त्या तत्वावर विक्री करण्यात येईल.

विक्री करावयाच्या मालमत्तांसाठी आरक्षित किंमत आणि इसारा अनामत रक्कम खालील प्रमाणे नमूद करण्यात आलेली आहेः-

अनु. क्र.	मालमत्तेचे वर्णन / मालकाचे नाव	आरक्षित किंमत / इसारा अनामत रक्कम (ईएमडी)
१.	श्री. श्री. योगेश सावंत आणि सौ.मयुरी योगेश सावंत यांच्या नावातील दिनांक १२.०३.२०१९ रोजीच्या कुर्ला ३ एसआरओ च्या विक्री करार क्र.के आर एल ३-३३४१/२०१९ मध्ये अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या हायस्ट्रीट, डी मार्ट जवळ, पवई गाव, कुर्ला तालुका, मुंबई उपनगर, उप-नोंदणा जिल्हा, मुंबई शहर येथील सीटीएस क्र.२०,२१,२२,२९ आणि ३०(भाग)अंतर्गत समाविष्ट असलेल्या १५१३१५ चौ.मीटर जागेमध्ये बांधकाम केलेल्या किंगस्टन' ए विंग को-ऑप. हाउसिंग सोसायटी लिमिटेड नावाच्या सोसायटीतील किंगस्टन इमारतीच्या ८ व्या मजल्यावरील निवासी सदनिका क्र. ८०६ चा तो सर्व तुकडा आणि भाग, क्षेत्रफळ ८५५.११ चौं. फुट (बांधकामाखालीलक्षेत्र) आणि पुढील प्रमाणे सीमीत, उत्तर दिशेकडे : बांधकाम सुरु असलेली इमारत, दक्षिण दिशेकडे ; निवासी इमारत, पुर्व दिशेकडे : मार्ग प्रवेश, पश्चिम दिशेकडे ; निवासी इमारत,	राखीव किंमत : रुपये१,८०,८१,०००/- (रुपये एक कोटी ऐंशी लाख एक्क्याऐंशी हजार फक्त फक्त) ईएमडी : १८,०८,१००/- (रुपये अठ्ठरा लाख आठ हजार शंभर फक्त)
विक्रीची तारीख आणि ठिकाण	दिनांक १२.०७.२०२१ रोजी दुपारी ०२.०० वाजता, दि साऊथ इंडियन बँक लिमिटेड, प्रादेशिक कार्यालय, ८०२, बी विंग, परिणी क्रेसेन्झो, जी ब्लॉक, वांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स (बी के सी),वांद्रा (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र- ४०० ०५१.येथे दुर./भ्रमणध्वनी क्र.: ९७५१९९१८११	

विक्रीच्या तपशीलवार शर्ती आणि अटींसाठी, कृपया दि साऊथ इंडियन बँक लिमिटेड ची वेबसाईट म्हणजेच www.southindianbank.com मध्ये देण्यात आलेली लिंक संदर्भित करावी.

ठिकाणः मुंबई
दिनांक : २५.०६.२०२१

प्राधिकृत अधिकारी
(मुख्य व्यवस्थापक)
दि साऊथ इंडियन बँक लिमिटेड

एल&टी फायनान्स होल्डिंग्स लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय
बृंदावन, प्लॉट नं. १७७, सी.एस.टी. रोड, कलिना, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई – ४०० ०९८, महाराष्ट्र, भारत
CIN: L67120MH2008PLC181833
T +९१ २२ ६२१२ ५०००
F +९१ २२ ६२१२ ५५५३
E igrc@ltfs.com
www.ltfs.com

L&T Finance Holdings

सूचना

कंपनीच्या समभागांचे इनवेस्टर एज्युकेशन अँड प्रोटेक्शन फंडात (''आयईपीएफ'') हस्तांतरण

कंपनी कायदा, २०१३ (''कायदा'') चे कलम १२४(६) हे वेळोवेळी बदलणाऱ्या इनवेस्टर एज्युकेशन अँड प्रोटेक्शन फंड अथोरिटी (अकाउंटिंग, ऑडिट, ट्रान्सफर आणि रिफंड) नियम, २०१६ सोबत ('' नियम'') वाचले असता त्यात स्पष्ट केले आहे की सलग सात वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीसाठी लाभांशाचा दावा न करण्यात आलेले सर्व समभाग आयईपीएफ अथोरिटीच्या (''आयईपीएफ खाते'') डीमॅट खात्यात हस्तांतरित करणे आवश्यक आहे. तसेच, कंपनीने आयईपीएफ खात्यात हस्तांतरित होण्यास पात्र असलेले समभाग ज्या भागधारकांचे आहेत (''भागधारक'') त्यांना, समभाग हस्तांतरित करायच्या तारखेच्या तीन महिने आधी, आपल्या नोंदीतील ताज्या उपलब्ध पत्त्यावर कळवावे आणि मोठ्या प्रमाणावर वितरित होणाऱ्या अग्रणी दैनिकात इंग्रजी व स्थानिक भाषेत सूचना प्रसारित करावी आणि त्या सूचनेत भागधारकांचे नाव, त्यांचा फोलिओ क्रमांक किंवा कंपनीच्या वेबसाइटवर उपलब्ध असलेला डीपी आयडी–क्लायंट आयडी ह्याची माहिती द्यावी.

ही सूचना वरील कायद्यातील आणि नियमातील तरतुदींनुसार प्रसारित केली जात आहे आणि ज्या भागधारकांचे भाग आर्थिक वर्ष २०२१–२२ दरम्यान अथोरिटीला हस्तांतरित होत आहेत त्यांच्यासाठी ही सूचना आहे.

कंपनी/रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट म्हणजे लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (''आरटीए'') ह्यांनी आयईपीएफ खात्यात हस्तांतरित होणाऱ्या समभागांसंबंधीत भागधारकांना त्यांच्या नोंदणीनुसार ताज्या पत्त्यावर वैयक्तिक सूचना पाठवली आहे.

सलग सात वर्षे ज्यांनी लाभांशावर दावा केलेला नाही आणि ज्यांचे समभाग आयईपीएफ खात्यात हस्तांतरित होत आहेत अशा कंपनीच्या भागधारकांचा संपूर्ण तपशील कंपनीच्या https://www.ltfs.com/investors.html वेबसाइटवर उपलब्ध आहे.

आर्थिक वर्ष २०१३–१४ पासून पुढे, न दिलेल्या लाभांशाच्या दाव्याकरिता कंपनीकडे २९ ऑगस्ट २०२१ पर्यंत कंपनीच्या भागधारकांकडून कोणताही संपर्क झाला नाही तर कंपनी नियमाच्या पूर्ततेसाठी भागधारकांना पुढील कोणतीही सूचना न देता, नियमांमध्ये नेमून दिलेल्या प्रक्रियेनुसार देय तारखेला आयईपीएफ खात्यामध्ये समभाग हस्तांतरित करेल.

कृपया नोंद घ्या की सदर नियमांनुसार, दावा न केलेल्या लाभांशासंबंधी आणि आयईपीएफ खात्यात हस्तांतरित होणाऱ्या समभागासंबंधी, कंपनीविरुध्द कोणताही दावा शिल्लक राहाणार नाही.

कंपनीच्या भागधारकांनी नोंद घ्यावी की आयईपीएफ खात्यामध्ये हस्तांतरित होणाऱ्या समभागांवर आणि, जर असतील तर, अशा समभागांवर प्राप्त होणाऱ्या सर्व लाभांवर आयईपीएफ अथोरिटीकडे पुन्हा दावा करता येईल, ज्यासाठी आयईपीएफ नियमांमध्ये दिलेल्या प्रक्रियेचा अवलंब करावा लागेल.

ह्यासंबंधी कोणतीही चौकशी करायची असेल तर कृपया संपर्क करा:
लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड,
युनिट: एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड,
सी–१०१, २४७ पार्क, एल.बी.एस. मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई, महाराष्ट्र, भारत.
फोन: +९१ २२ ४९१८ ६२७०, फॅक्स: +९१ २२ ४९१८ ६०६०, ई–मेल: rnt.helpdesk@linkintime.co.in.

एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेडसाठी

अपुर्वा राठोड
कंपनी सचिव
एसीएस – १८३१४

स्थान: मुंबई
दिनांक: २४ जून २०२१